'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 124 B : महिलांची सुरक्षितता व सशक्तीकरण अंतर्गत महिलांमध्ये करावयाची सामाजिक व कायदेविषयक जाणीव जागृती
ISSN : 2348-7143
Feb. 2019

23

## महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

यांच्या सहयोगातून

## एक दिवसीय राष्ट्रीय परिषद (आंतरविद्या शाखीय)

– आयोजक –

चाळीसगांव एज्युकेशन सोसायटीचे

## बी.पी. आर्टस्, एस.एम.ए. सायन्स, अॅन्ड के.के.सी. कॉमर्स कॉलेज

चाळीसगाव, जि. जळगाव.

– विषय –

# महिलांची सुरक्षितता व सशक्तीकरण अंतर्गत महिलांमध्ये करावयाची सामाजिक व कायदेविषयक जाणीव जागृती

१४ फेब्रुवारी, २०१९

संपादक मंडळ

अतिथी संपादक
प्राचार्य डॉ. मिलिंद बिल्दीकर
चाळीसगांव एज्युकेशन सोसायटीचे बी.पी. आर्टस्, एस.एम.ए. सायन्स, अॅन्ड के.के.सी. कॉमर्स कॉलेज, चाळीसगाव, जि. जळगाव.

कार्यकारी संपादक
प्रा. डॉ. दिलीपसिंह निकुंभ
चाळीसगांव एज्युकेशन सोसायटीचे बी.पी. आर्टस्, एस.एम.ए. सायन्स, अॅन्ड के.के.सी. कॉमर्स कॉलेज, चाळीसगाव, जि. जळगाव.

सह संपादक
प्रा. रविंद्र पाटील
चाळीसगांव एज्युकेशन सोसायटीचे बी.पी. आर्टस्, एस.एम.ए. सायन्स, अॅन्ड के.के.सी. कॉमर्स कॉलेज, चाळीसगाव, जि. जळगाव.

मुख्य संपादक
प्रा. धनराज धनगर
एम.जी.व्ही.एस. आर्टस्, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज, येवला, जि. नाशिक.

## INDEX


| No. | Title of the Paper's and Author's | Page No. |
|---|---|---|
| ०१ | मानवाधिकार आणि स्त्री जीवन<br>डॉ. विजय कृष्णराव काळे | ००१ |
| ०२ | ग्रामीण व आदिवासी महिलांचे सशक्तीकरण<br>प्रा. एन.के. जाधव | ००३ |
| ०३ | महिलांची सुरक्षितता – सामाजिक व कायदेविषयक जाणीव जागृती<br>प्रा.डी.एस. उंबरकर | ००५ |
| ०४ | महिला सक्षमिकरणात कायद्याची भूमिका – एक अभ्यास<br>प्रा. सुनिल अजाबराव पाटील | ००८ |
| ०५ | भारतीय संरक्षण आणि महिलांची भूमिका<br>प्रा.डॉ. राजु सिताराम पवार | ०११ |
| ०६ | स्थानिक राजकारणात महिलांचा सहभाग<br>प्रा.डॉ. राजू परभत निकम | ०१३ |
| ०७ | महिला सक्षमिकरण व उपाय<br>डॉ. वसंत पी. राऊत | ०१५ |
| ०८ | महिलांचे सबलीकरण आणि कायदे<br>डॉ. मिना एम. वडगुळे | ०१७ |
| ०९ | महाराष्ट्र विधानसभेतील महिला सहभागाचा अभ्यास<br>प्रा. माधव शं. वाघमारे | ०२० |
| १० | ग्रामीण व आदिवासी महिलांचे आर्थिक सशक्तीकरण<br>प्रा.डॉ. वायसे शामराव भगवान | ०२२ |
| ११ | आदिवासी महिलांचे सशक्तीकरण काळाची गरज<br>डॉ. पिसाळ अनिता संभाजी | ०२५ |
| १२ | भारतीय राजकारणातील महिलांचे योगदान<br>डॉ. लिंबोळे गणेश मनोहर | ०२८ |
| १३ | भारतीय संविधानाच्या संदर्भात महिलांचे अधिकार व त्यांची वास्तविकता<br>प्रा. संतोष बुधाजी भावार्थे | ०३१ |
| १४ | महाराष्ट्रातील स्त्रियांचे दुय्यम स्थान : एक अभ्यास<br>प्रा. शशिकांत दिवाण भामरे, प्रा. प्रभाकर वसंत पगार | ०३३ |
| १५ | महिला सबलीकरणासाठी शासकीय योजनांचे योगदान<br>प्रा. शशिकांत दिवाण भामरे, प्रा. प्रमोद भरतसिंग पवार | ०३५ |
| १६ | महिला सक्षमीकरणात बचत गटाची भुमिका<br>प्रा. अजय वासुदेव काटे, प्रा. अंकुश रणजित जाधव | ०३८ |
| १७ | महिलांचे स्थान व दर्जा<br>प्रा. वाघचौरे अशोक भावराव | ०४० |
| १८ | महिलांच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र शासनाने केलेल्या उपाययोजना व महिला कल्याणासाठीचे कायदे<br>प्रा. सौ. सुनिता अरविंद जगताप | ०४३ |
| १९ | राजकीय समानता आणि महिला सक्षमीकरण<br>प्रा. निलेश अशोकराव देवरे | ०४६ |
| २० | महिलांची सुरक्षितता आणि स्वयंसेवी संस्था<br>प्रा. गणेश सुखदेव रोडे, प्राचार्य. डॉ.राजधर जयवंतराव टेमकर | ०४८ |
| २१ | स्त्री सक्षमीकरण : काही कायदे<br>डॉ. स्नेहल संजय मराठे | ०५० |

ISSN : 2348-7143
Feb. 2019

# महिलांचे स्थान व दर्जा

प्रा. वाघचौरे अशोक भावराव
महात्मा गांधी विद्यामंदीर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड आर्ट, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, कॅम्प, मालेगाव जी-नाशिक.

निसर्ग अवस्थेतून सामाजिक अवस्थे मध्ये येतांना मानवी विकासाच्या वाटचालीत अनेकप्रकारचे बदल झाल्याचे दिसून येते .मानवाच्या संस्कृती मध्ये अनेक प्रकारचे बदल झाल्याचे दिसून येते. मानवी समुदायाने आपल्या परीने आपली सामाजिक वाटचाल यशस्वी पणे करण्याचा प्रयत्न केला . मुळातच स्वतंत्र असलेले मानवी जीवन काळाच्या ओघात अनेक प्रकारे बंदिस्थ होत गेले .माणसानेच जन्माला घातलेले धर्म, राज्य, संस्कृती,, यांच्या प्रभावाने मानवी जीवन अनेक प्रकारे बंदिस्थ होत गेले.आणी याची सर्वात जास्त झळ कुणाला पोहचली असेल तर ती अर्ध्या लोकसंख्येला म्हणजे महिलांना बसलेली दिसून येते.

मानवी समाजाच्या प्रगतीचा इतिहास हा मानवी अधोगतीचा देखील इतिहास असू शकतो मानवाने निर्माण केलेल्या अनेक सामाजिक संस्था आणी संरचना या मानवी अधोगतीला देखील कारणीभूत दिसून येतात, निसर्गात; पूर्णपणे स्वतंत्र असलेला माणूस, अनेक क्षमतानी परिपूर्ण असलेल्या माणूस हा मानवानेच निर्माण केलेल्या समाजापुढे हतबल झालेला दिसून येतो. या मानवी संस्था धार्मिक ,राजकीय, सांस्कृतिक अश्या कोणत्याही प्रकारच्या असू शकतात. या संस्था आणी संरचन यांच्या दृष्टीकोनातून महिलांचे स्थान व दर्जा यांचे अध्ययन हे तितकेच महत्वपूर्ण दिसून येते.

**सांस्कृतिकदृष्ट्या महिलांचे स्थान व दर्जा**

मानवी संस्कृती म्हटली की संस्कृतीमध्ये अंतर्भूत होणाऱ्या बाबी या एखाद्या मानवी समुदायाने स्वीकारलेली मूल्य ,दृष्टीकोन, विश्वास, श्रद्धा, उपासना ,परंपरा ,वेशभूषा ,भाषा,लिपी,म्हणी ,आन्हिक, मिथक, तत्वे, राहणीमान ,धर्म ,खानपान या सर्व बाबींचा त्यात समावेश होत असतो . एखाद्या मानवी संस्कृतीचे प्रारूप हे सर्व अंगानी परीदृढ होत असते. आणी त्याच्या अनुषंगाने मानवी व्यवहार हा निश्चित होल असतो. आणी या सर्व मानवी व्यवहारात महिलांचे सामाजिक स्थान काय यावर त्यांचे जीवनमान ठरत असते. जगभरात अनेक सांस्कृतिक प्रारूपे आपणास दिसून येतात. यात मूल्य संरचने प्रमाणे मानवाचे वेगवेगळे व्यवहार देखील आपणास पहावयास मिळतात .विविध मानवी संस्कृतींचा अभ्यास केला असता असे दिसून की काळाच्या ओघात महिलांचे स्थान व दर्जा  दुय्यम झालेला आहे त्याचे विवेचन खालील प्रमाणे -

**धर्म** – जगभरातील विविध धर्मांचे अध्ययन केल्यानंतर असे दिसून येते की धर्म हा मुळातच असमानतेवर आधारलेला असतो त्यातून वेगवेगळे सामाजिक वर्ग तयार होतांना दिसून येतात . तसेच धर्म हा मिथकांवर आधारलेला असल्याने त्या धर्मात जी मिथके आढळून येतात त्या प्रमाणे त्या धर्मातील अनुयायांचा परस्परातील व्यवहार दिसून येतो हिंदू धर्मात लक्ष्मी–नारायण हे मिथक  हिंदू महिलांना पतीची सेवा करावयास आपोआप भाग पाडते. किंवा रामायणाचा प्रभाव हा संपूर्ण हिंदू धर्मावर पडलेला दिसून येतो. यात राम हा पुरुषार्थासाठी तर सीता ही पतीची सेवा करणारी दाखवलेली आहे .या मिथकांचा मानवी समुदायावर जो प्रभाव पडतो तो पाहता असे लक्षात येते की यातून महिलांचा जो दर्जा आणी स्थान निर्माण होणार आहे ते दुय्यम असणार आहे .हिंदू धर्मात महिलांना अविवाहित असतांना वडिलांच्या आज्ञेत, तरुणपणी पतीच्या आज्ञेत तर म्हातारपणी मुलाच्या आज्ञेत राहावयास सांगितलेले आहे.. मध्यपूर्वेत इस्लामचा प्रभावातून निर्माण झालेली जी जीवनपद्धती आहे त्यात महिलांना बुराखा पद्धत  स्वीकारावी लागली आहे इस्लाम मध्ये जी बहुपत्नी पद्धती दिसून येते तिला धार्मिक आधार दिसून येतो . हिंदू धर्मात अनेक वेगवेगळ्या पद्धतीचे मिथक दिसून येतात उदाहरणार्थ  हिंदू धर्मात साधरणता;तीन प्रकारचे संप्रदाय दिसून येतात यात शैव आणी वैष्णव संप्रदायातील मिथके ही पुरुषप्रधान आहेत तर शाक्त संप्रदायातील मिथके ही स्री;प्रधान आहेत ही मिथके आद्य देवतेला स्रीरूप मानते म्हणजेच जगाची उत्पत्ती करणारी आद्य शक्ती हि स्रीरूप आहे असे मानते भारतीय समाजमानसात महत्वाचे मिथक म्हणजे कालिका जी नरमुंडाची माळ गळ्यात घालते किंवा वाघासारख्या प्राण्यावर स्वार झालेली जगदंबा या मिथकांचे देखील अस्तित्व दिसून येते परंतु पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये ही मिथके एक तर स्वीकारली जात नसतात किंवा इतर अस्तित्वात असलेल्या मिथाकांच्या तुलनेत दुय्यम तरी ठरवलेली असतात.

**विचारप्रणालीच्या आधारे महिलांचा दर्जा आणी स्थान**

**मार्क्सवादी विचारधारेच्या आधारे विवेचन** – १९ व्या शतकातील सर्वात महत्वपूर्ण विचारधारा म्हणजे मार्क्सवादी विचारधारा होय. मार्क्सवाद्यांनी स्रीवादाचे स्वतंत्र असे विवेचन केले आहे . त्यांचे मते आधुनिक स्री दास्य हे भांडवलशहांची देणगी असून निसर्ग अवस्थेतून माणूस हा खाजगी संपत्ती च्या अवस्थेमध्ये आला म्हणजेच तो आदिम साम्यवादी अवस्थेमधून त्याने खाजगी संपत्तीची अवस्था स्वीकारली .समाजाचा आर्थिक पाया बदलल्याने समाजाचा सांस्कृतिक पाया देखील बदलला . नव्या सांस्कृतिक व्यवस्थेत नवीन सांस्कृतिक धारणा प्रचलित झाल्या त्यातून स्रियांचे सामाजिक स्थान दुय्यम झाले.मार्क्सवादी मानतात की आदिम साम्यवादी व्यावस्थेनंतर ज्या सरंजामी व्यवस्थेला सुरवात झाली त्या व्यवस्थेनुसार खाजगी संपत्तीला आपला स्व;तहाचा वारसदार हवा होता आणी त्यासाठी स्रियांच्या गर्भाशयावर माणसाला अधिकार हवा होता.यासाठी धर्म नावाची संस्था त्याच्या मदलीला धावून आली. धार्मिक संस्थांच्या मदतीने महिलांना व्रत वैकल्यामध्ये अडकविण्यात आले.मार्क्सवादी मानतात की तात्कालीन समाजामध्ये आधुनिक वैद्यकीय व्यवस्था नसल्याने महिलांना पतिव्रता ,योनिसुचीता अश्या व्यवस्थेमध्ये अडकविण्यात आले. त्यासाठी धार्मिक मिथके तयार करण्यात आली. या धार्मिक व्यवस्थेच्या विरोधात वागणार्यांना शिक्षेची तरतूद करण्यात आली .तर या नुसार वागणार्यांना योग्य त्या बक्षिसाची व्यवस्था करण्यात आली. एकूणच या व्यवस्थेमुळे महिलांच्या पुनो;उत्पादन व्यवस्थेवर पुरुषांचा एकाधिकार निर्माण झाला .मार्क्सवादी विचारवंतांच्या मते भांडवलशाही अशी व्यवस्था आहे की जिच्यामुळे मानवी समाजाचे स्वतंत्र असे प्रारूप तयार झाले.आणी या प्रारूपामध्ये महिलांना दुय्यम असा स्थान व दर्जा मिळाला. भांडवलशाहीच्या रक्षणासाठी जी राज्य नावाची व्यवस्था निर्माण झाली त्या राज्य नावाच्या व्यवस्थेने देखील .पारंपारिक सांस्कृतिक व सामाजिक आधारावर कायदे निर्माण करून पारंपारिक व्यवस्थेला आधार निर्माण करून दिला .थोडक्यात मार्क्सवादी विचारधारा अशी मांडणी करते की आधुनिक भांडवलशाही ही महिलांचे समाजातील स्थान व दर्जा दुय्यम करण्यासाठी कारणीभूत आहे. मार्क्सवादी अशी देखील मांडणी करतात की जर भांडवलशाहीच्या विरोधात क्रांती झाली तर जुनी सांस्कृतिक व सामाजिक व्यवस्था नष्ट होऊन जाईल आणी नव समाज निर्माण होईल त्यात धर्म आणी राज्य व्यवस्था नष्ट होऊन जाईल शोषण विरहित समाजात महिलांचे स्थान व दर्जा हा पुरुषांच्या बरोबरीचा होइल.

**उदारवादी विचारधारेनुसार महिलांचे स्थान व दर्जा** – युरोपियन प्रबोधनाच्या कालखंडात उदारवादी विचारधारेला महत्व प्राप्त झाले धार्मिक

११. अनुच्छेद २६ धर्मविषयक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य
१२. अनुच्छेद ३९ – स्त्री –पुरुष दोघांना समान वेतन
१३. अनुच्छेद ४२ – कामाच्या ठिकाणी न्याय्य व सुरक्षितता आणि प्रसुती सहाय्य देण्याची सोय
१४. अनुच्छेद ५१ – स्त्रियांच्या प्रतिमेला हानी पोहचविणाऱ्या प्रथा बंद करणे
१५. निवडणूक लढविण्याचा अधिकारशासन–प्रशासनात कोणतेही पद भुषविण्याचा अधिकार
१७. संपती विकत घेण्याचा,बाळगण्याचा व वडिल आणि पतिच्या संपत्तीत वाटा

**संविधानातील तरतुदींच्या अमंलबजावणी करिता असलेले विविध कायदे व योजना**

१) **विवाहासंबंधी कायदे –** हिंदू विवाह कायदा १९५५ , हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा १८५६,आनंद विवाह कायदा १९०९, आर्य विवाह विधिवत कायदा १९३७,मुस्लीम विवाह कायदा , मुस्लीम स्त्री घटस्फोट हक्क वसंरक्षण कायदा १९८६ ,ख्रिस्ती विवाह कायदा १८९२, विशेष विवाह कायदा १९५४, धर्मांतरित व्यक्ती विवाह विछेद कायदा १८६६, हिंदू दत्तक व निर्वाह कायदा १९५६.

२) **मालमत्ता संबंधी कायदे–** हिंदू उत्तराधिकारी कायदा १९५६, विवाहित स्त्रियांचा संपत्तीचा कायदा १९५९, हिंदू वारसा हक्कातमालमत्तेत समान वाटप कायदा २००५ ,ख्रिचन ,पारसी ,मुस्लिम स्त्रियांना त्यांच्या मालमत्तेत व वारसा हक्कात स्थान

३) **फौजदारी कायदे –** स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंध कायदा १९८६,अनैतिक देह व्यापार प्रतिबंध कायदा ,वैद्यकीय गर्भापातन कायदा १९७१,हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१,बाल विवाह निर्बंध कायदा १९२९,कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ ,महाराष्ट्र नरबळी ,अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध कायदा २०१३,गर्भ धारणा पूर्ण आणि जन्म पूर्व निदान तंत्र ( लिंग निवड प्रतिबंध ) कायदा १९९४, जातिय अत्याचार प्रतिबंध कायदा कायदा१९८९, मानवी मैला वाहतूक प्रतिबंध कायदा.

४) **कामगार स्त्रियांचे अधिकार विषयक कायदे –** मातृत्व लाभ संबंधीचा कायदा १९६१, कारखाने कायदा १९४८, खाण कायदा , किमान वेतन कायदा १९४८, वेठ बिगार प्रथा प्रतिबंध कायदा १९७६ ,कामगारांसाठी नुकसान भरपाई कायदा १९२३,समान वेतन कायदा १९७६, नोकरीच्या ठिकाणी लैंगिक छळापसून महिलांचे संरक्षण विधेयक २०१०

अश्या प्रकारेसद्य काळात महिलांचे स्थान व दर्जा आहे.

**संदर्भ**

१. भारतीय राज्यघटना
२. स्री संघर्ष का इतिहास लेखक राधा कुमार .वाणी प्रकाशन
३. महिला सशक्तीकरण निधी भारद्वाज, सागर पुब्लीशरजयपूर
४. महिला साक्षरता एवं सामाजिक परिवर्तन उर्मिला बात्रा , मार्क पब्लिशर्स जयपूर
5. WOMEN IN INDI- U.N. REPORT 2006
6. CRS CENTRE FOR SOCI-L RESE-RCH